महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ५२ वे | दिनांक : १२/०२/२०२६ | वार : गुरूवार




## चंद्रपूरचा निर्णय फडणवीस-बावनकुळेंच्या अनुमतीनेच



**चंद्रपूर :** उबाठा आणि भाजप युतीबाबत मी स्वत: कोठेकर यांच्याशी दिवसातून चारदा चर्चा करायचो आणि बावनकुळे यांच्याशी चर्चा करायचो आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अनुमती घेतली जेव्हा उबाठाला एक वर्ष देण्याची चर्चा सुरू असताना मुख्यमंत्र्यांना या संदर्भातील माहिती दिली. तेव्हा मुख्यमंत्री म्हणाले एक वर्ष नाही गरज असेल तर सव्वावर्ष द्या. महापौर हा भाजपचा झाला पाहिजे, पहिले महापौर आमच्याकडे असावा, असे भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, चंद्रपूर भाजपमध्ये दोन गट आहे हे सर्वांना माहिती आहे त्यामुळे काही कार्यकर्ते चाणाक्य, किंगमेकर अशी बॅनरबाजी करतात. कार्यकर्त्यांना गटनेता आपल्या गटाचा झाला नाही याचे वाईट वाटले होते पण महापौर आपला झाल्याने त्यांना आनंद झाला. कुणी क्रेडिट घेऊन काय फायदा करार कुणासोबत झाला आहे? असा टोला आमदार जोरगेवार यांना लगावला आहे.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अनुमतीने संगीताताई खांडेकर यांचे नाव रवींद्र चव्हाण यांनी लेखी दिल्यावर आमच्या पक्षाच्या दुसऱ्या एका नेत्याने सारिकाताई संदूरकर यांना भरीस घातले आणि कारण दिनले की पक्षाच्या उमेदवाराचा अर्ज बाद झाला तर काय? मग तोच नियम त्यांच्या गटाचे उपमहापौर होते त्यांचे नाव आले तिथे तसे झाले नाही, असे म्हणत आमदार किशोर जोरगेवार यांच्यावर नाव न घेता टीका केली आहे. जनता आणि पत्रकार यांना माहिती आहे मी कुणाबद्दल बोललो.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उद्धव ठाकरेंशी बोलतात असे मला कधीही सांगण्यात आलेले नाही. एबी फार्म कुणी चोरले याची चौकशी पक्षाकडून सुरू आहे. काही प्रभागात ३ ते ४ एबी फॉर्म देण्यात आले, ज्या पद्धतीने बदल करण्यात आले त्यांची चौकशी पक्षाच्या बैठकीत केली जाईल.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, चंद्रपूरमध्ये मला पक्षाचे काम करणारा माणूस हवा होता, माझ्या गटाचा तटाचा असे काही नाही. त्यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी गटनेता आमचाच हवा असा आग्रह धरला होता. तेव्हा मी महापौर आमचा द्या असे म्हणाले होतो. चंद्रपूर मनपाचा महाराष्ट्राच्या राजकारणाशी काहीही संबंध नसतो. कुणाकडे बहुमत नव्हते कुणाची तरी मदत घ्यावीच लागणार होती. दोघांना समान संधी होती, आम्ही संधीचे सोने केले.

## राष्ट्रवादी भविष्यातही NDA सोबतच राहणार सुनील तटकरेंची स्पष्टोक्ती



**नवी दिल्ली :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आपला पक्ष भविष्यातही केंद्रातील सत्ताधारी NDA सोबतच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्यानंतर तटकरेंनी ही भूमिका विषद केली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या कथित विलीनीकरणाचा मुद्दा तूर्त लोंबकळल्याचा दावा केला जात आहे.

अजित पवार यांचे गत २८ जानेवारी रोजी एका विमान अपघातात निधन झाले. तेव्हापासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. शरद पवार गटाकडून आपली अजित पवारांशी विलीनीकरणाच्या मुद्यावर चर्चा सुरू होती असा दावा केला आहे. पण अजित पवार गटाच्या प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरेंसारख्या नेत्यांनी हा दावा जोरकसपणे फेटाळून लावला आहे. अजित पवारांनी अशी एखादी चर्चा सुरू असती तर आम्हाला जरूर सांगितली असती, असा त्यांचा युक्तिवाद आहे. या पार्श्वभूमीवर सुनील तटकरे यांनी आज सुनेत्रा पवार यांच्यासोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली.

या भेटीनंतर सुनील तटकरे पत्रकारांशी बोलताना उपरोक्त भूमिका विषद केली. ते म्हणाले, विलीनीकरणाच्या मुद्यावर आमच्या पक्षाच्या भूमिकेचा प्रश्नच येत नाही. कारण, आम्ही वारंवार विचारत आहोत की, विलीनीकरण कोणत्या पक्षात करायचे? दुसरी गोष्ट म्हणजे आम्ही सध्या एनडीएमध्ये आहोत. दादा असतानाच मी आमची भूमिका स्पष्ट केली होती. दादांच्या नेतृत्वात आम्ही एनडीएसोबत जाण्याचा निर्णय घेतला होता. आमची तीच भूमिका आजही कायम आहे. आम्ही भविष्यातही एनडीएसोबतच राहू.

ते पुढे म्हणाले, एनडीएम्ध्ये येण्यासंबंधीची स्पष्टता कुणीतरी करणे आवश्यक आहे. आता विलीनीकरण किंवा काय होईल हा मुद्दा वेगळा आहे. सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली आहे. आता त्याच विधीमंडळ पक्षाच्या नेत्या असाव्यात अशी आमची भूमिका होती. त्यानुसार त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राष्ट्रवादीच्या सर्व बैठकांत अजित पवार आपण एनडीएसोबत जायला हवे अशी भूमिका मांडत होते. २०१९ साली ३ पेक्षा दोन पक्षांनी एकत्र आल्यास राज्याचा चांगला विकास होईल असा त्यांचा विचार होता, असेही सुनील तटकरे यावेळी बोलताना म्हणाले.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ फेब्रुवारी २०२६

# अभंग संपदेचं देहू गावी होणार प्रकाशन

**उमरगा** : सामाजिक, संप्रदायिक आणि शिक्षण या विभागामध्ये आपले आयुष समर्पित केलेल्या अनेक नामवंत, गुणवंताच्या सामूहिक प्रयत्नातून अभंग संपदा प्रातिनिधिक ग्रंथाचे जगद्गुरु तुकोबाराय यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या महाराष्ट्रातील देहूगावी प्रकाशन होणार आहे.ह्या सोहळ्यास महाराष्ट्र लोकविकास मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष विश्वनाथ (अण्णा) तोडकर प्राचार्य गोविंद बिराजदार, प्राचार्य वेंकट अणिगुंटे, जागतिक लेवलवरचे पाणी संशोधक अभ्यासक सामाजिक कार्यकर्ते विलास कुलकर्णी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील अनेक गुणवंत साहित्यिक सांप्रदायिक कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.या कार्यक्रमाचे आयोजन काव्यप्रेमी महाराष्ट्र आणि उत्तरदायित्व एनजिओ फाउंडेशन या स्वयंसेवी संघटनेच्या वतीने केले जाणार असल्याची माहिती फाउंडेशनचे विश्वस्त प्रमुख श्रुतीताई डिंबळे,नागेश गायकवाड, हरिचंद्र ढाकणे यांनी केले आहे. अभंग संपदेतील साहित्यिकांना ट्रॉफी देऊन प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते सन्मानित केले जाणार आहे.तर इतर सहभागी साहित्यिक कवी यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.अभंग संपदेचे संपादक भूमिपुत्र वाघ,सुधाकर झिंगाडे, कमलाकर भोसले, विकास राठोड,तसेच प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण पवार यांची उपस्थिती असणार आहे.हा प्रकाशन सोहळा दिनांक 17/02/2026. सकाळी 11 ते 03 वाजता अभंग मंगल कार्यालय गाथा मंदिर रोड देहूगाव येथे होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. विविध क्षेत्रातील साहित्यिकांनी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहनही केले आहे..

# शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची परिसर मुलाखतीतून साई अमृत प्रा. लि. या कंपनीत नियुक्ती



**कन्नड** : शिवाजी महाविद्यालय कन्नड येथील प्लेसमेंट सेल विभागाअंतर्गत दिनांक ०२ जानेवारी रोजी परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते, या परिसर मुलाखतीसाठी नामांकित कंपनी साई अमृत डेरी प्रायव्हेट लिमिटेड श्रीरामपूर, या कंपनीमार्फत लॅब केमिस्ट, शिफ्ट इन्चार्ज व मिल्क कलेक्शन रूट एक्झिक्यूटिव्ह या पदांसाठी महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील पदवीधर विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या परिसर मुलाखतीसाठी साई अमृत डेरी प्रायव्हेट लिमिटेड चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री निलेश बनकर तसेच कॉर्पोरेट अँड मॅनेजमेंट ट्रेनर श्री सचिन दाभाडे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पात्रता, तांत्रिक ज्ञान, संवाद कौशल्ये तसेच व्यक्तिमत्त्व विकासाच्या आधारे या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखत प्रक्रियेमध्ये ५३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. मुलाखत प्रक्रियेतून १३ विद्यार्थ्यांची विविध पदावर निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीने नियुक्तीपत्र देऊन ८ फेब्रुवारी रोजी कंपनीमध्ये रुजू करून घेण्यात आले. मुलाखतीत निवड होऊन रुजू झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये केमिस्ट या पदावर नेहा गायके, अभिजीत बर्वे, कोमल शिंगारे, कोमल वाघोळे, ऋषिकेश चव्हाण,प्रीती मरमठ, प्राप्ती जाधव, नितीन काटकर व रवीना पवार यांचा समावेश आहे, शिफ्ट इन्चार्ज या पदावर शिवा सोनवणे व नितीन आढाव तसेच रूट एक्झिक्युटिव्ह या पदावर अभय अंकुशराव शिंदे व एडमिन एक्झिक्यूटिव्ह डाटा या पदावर निलेश सोळुंके याची निवड करण्यात आली. या सर्व परिसर मुलाखत प्रक्रियेसाठी संस्था अध्यक्ष श्री मानसिंहजी पवार तसेच संस्थेचे सचिव श्री चंद्रकांत देशमुख, कोषाध्यक्ष श्री बाबासाहेब मोहिते, श्री कृष्णा पाटील व सर्व संचालक मंडळाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले तसेच निवड होऊन रुजू झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या परिसर मुलाखत प्रक्रियेमध्ये मुलाखती पासून ते विद्यार्थी कंपनीमध्ये रुजू होण्यापर्यंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय भोसले सर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून व मार्गदर्शनाखाली सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.या परिसर मुलाखत व विद्यार्थी कंपनीत रुजू होण्याची प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.बी.के. मगर सर तसेच प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. मंगेश जाधव यांचे सहकार्य लाभले.

# बुन इंग्लिश स्कूल येथे 'आनंद नगरी' उत्साहात साजरी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** येथील बुन इंग्लिश स्कूल बलसा रोड येथे मंगळवार रोजी 'आनंद नगरी' हा उपक्रम मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. आनंद नगरी चे उद्घाटन खुशालराव घुगे अंबरवाडीकर यांच्या हस्ते करण्यात आलेया कार्यक्रमाला नफिस मामू, ज्येष्ठ पत्रकार सिराज सिद्दीकी, अहमदभाई पत्रकार, माबुद भाई पत्रकार आदी मान्यवरांची उपस्थिती होती बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला पालक, शिक्षक व मान्यवरांची लक्षणीय उपस्थिती लाभली.'आनंद नगरी' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी विविध साहित्यांचे व फराळ हॉटेल व मनोरंजनात्मक उपक्रम दुकाने लावली होती पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत शाळेच्या उपक्रमशीलतेचे स्वागत केले.कार्यक्रमाच्या शेवटी मान्यवरांनी बुन इंग्लिश स्कूलच्या 'आनंद नगरी' उपक्रमांचे कौतुक करत भविष्यातही असे उपक्रम राबविण्यास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वीसाठी या इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापिका शाहीन मॅडम, महेविश सिद्दीकी मॅडम, शहेबाज सर,तबसूम मॅडम, निलोफर मॅडम, उकाशा मॅडम, शिजा सिद्दीकी मॅडम, आयशा मॅडम, सुलताना बाजी अदी शिक्षकांनी परिश्रम घेतले

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


# आठवणी... त्या चिमण्या कुठं गेल्या?

**आज** सकाळी कामाला जाण्याची तयारी करून घराबाहेर पडलो, तर सिमेंटच्या अंगणात एक चिमणी चिवचिव करताना दिसली. लगेच तिच्या मागे दुसरी चिमणी आली आणि खाण्यासाठी काही मिळते का ते शोधू लागली. पण बिचारीला काय माहीत की हे सिमेंटचं जंगल आहे! आईने चिमण्या पाहिल्या, पण घरात वेळेवर बाजरीचे दाणे सापडले नाहीत म्हणून तिने मूठभर तांदूळ आणून अंगणात टाकले. चिमण्यांनी ते तांदूळ खाल्ले आणि आनंदाने उडून गेल्या.क्षणभर वाटलं, जणू दुधाची तहान ताकावर भागवून त्या निघून गेल्या. तरीही मनाला आनंद झाला की सिमेंटच्या जंगलात आज चिमणी दिसली. कारण आता चिमण्या सहसा आढळत नाहीत. घराच्या शेजारीच गौताळा अभयारण्य असल्यामुळे त्या दोन चिमण्या चुकून इथे आल्या असाव्यात. त्यांच्या निमित्ताने बालपणीच्या आठवणी जाग्या झाल्या... आणि मनात प्रश्न उमटला .. बालपणी ज्या चिमण्यांसोबत आम्ही मजामस्ती करायचो, त्या चिमण्या कुठं गेल्या?आम्ही लहान असताना अंगणात रोज चिमण्यांची जणू शाळाच भरायची. दिवसभर चिवचिवाट चालायचा. त्या धुळीत पंख फडफडवून जणू अंघोळ करत असत आणि आम्ही म्हणायचो, “चिमण्या आंघोळ करत आहेत!”आई रोज सकाळी अंगणात बाजरी-ज्वारीचे मूठभर दाणे टाकायची. चिमण्यांसोबतच गावातील कुत्र्यांना आणि गाईंनाही भाकर देणे तिचा नियमच होता.आमच्या भावंडांपैकी कोणाचा दात पडला, तर तो अंगणात न फेकता धाब्यावर फेकायला आई सांगायची. मी तिला विचारायचो, “असं का?” तर ती म्हणायची, “चुकून चिमणीने अन्न समजून तो दात खाल्ला तर तिचं पोट दुखेल. तिला आपल्याला सांगताही येणार नाही; तो मुका जीव आहे.” आईचं हे बोलणं ऐकून चिमण्यांची कीव यायची.उन्हाळ्यात चिमण्यांसोबतच इतर पक्ष्यांसाठी आई अंगणातील झाडावर घागर टांगायची. त्यात रोज ताजं पाणी भरायची. दुपारी तहान लागली की चिमण्या, कावळे, पेरत्या, मिठ्ठू, कोकीळ आणि साळुंकी असे अनेक पक्षी पाणी प्यायला यायचे. पोटभर पाणी पिऊन फांदीवर थोडा विसावा घ्यायचे आणि पुन्हा उडून जायचे.रविवारी शाळेला सुट्टी असली की आम्ही मित्रांसोबत चिमण्या पकडण्याचा खेळ खेळायचो. एक टोपलं काठीच्या आधाराने उभं करायचं, त्याला दोरी बांधून दूर जाऊन बसायचं. टोपल्याखाली बाजरीचे दाणे टाकले की चिमण्या खाण्यासाठी यायच्या. मग दोरी ओढली की टोपलं पालथं होऊन चिमण्या पकडल्या जायच्या. आम्ही त्यांच्या पंखांना हळद-कुंकवाचा हलका रंग लावून अलगद सोडून द्यायचो. त्या भुर्रकन उडून जायच्या... आणि थोड्या वेळाने पुन्हा अंगणात परतायच्या, जणू वाकुल्या दाखवत म्हणत असाव्यात — “पकडता येतंय का आम्हाला?”आज त्या आठवणी मनात दरवळतात... पण अंगण मात्र रिकामं आहे.चिवचिवाट हरवलाय... आणि मनात सतत एकच प्रश्न घुमतो — त्या चिमण्या कुठं गेल्या?

**- ज्ञानेश्वर गायके, कन्नड**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ फेब्रुवारी २०२६


## शिवार साहित्य पुरस्कार जाहीर; श्रीकांत ढेरंगे व विशाल तायडे सन्मानित




**औरंगाबाद :** प्रसिद्ध साहित्यिक कै. प्राचार्य रा.रं.बोराडे संस्थापक असलेल्या शिवार सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिवर्षी कृषक संस्कृतीशी नाते सांगणाऱ्या साहित्यकृतीला मागील चोवीस वर्षांपासून 'शेतकरी साहित्य पुरस्कार' दिला जातो. शिवार प्रतिष्ठानचा 'शेतकरी साहित्य पुरस्कार' साहित्यक्षेत्रात अतिशय प्रतिष्ठेचा समजला जातो. यंदापासून या पुरस्काराचे नाव कै. प्राचार्य रा. रं. बोराडे शेतकरी साहित्य पुरस्कार असे करण्यात आले आहे. यावर्षी २४ वा पुरस्कार संगमनेर येथील श्रीकांत ढेरंगे यांच्या 'चित्रक' या काव्यसंग्रहास व संदीप दळवी बालसाहित्य पुरस्कार सुप्रसिद्ध बालसाहित्यिक विशाल तायडे यांच्या 'ढ' बालकादंबरीस घोषित करण्यात आला आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक डॉ. श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात येईल. समारंभाच्या अध्यक्षस्थानी कथाकार मा. उत्तम बावस्कर असतील तर या काव्यसंग्रहावर सुप्रसिद्ध कवी व प्रतिष्ठानचे संपादक प्रा. श्रीधर नांदेडकर हे चित्रक संग्रहावर भाष्य करतील. तर 'ढ' बालकादंबरीवर श्रीमती मंजुषा क्षीरसागर या भाष्य करतील. हा सोहळा शनिवार २१ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता मराठवाडा साहित्य परिषदेचे डॉ. ना. गो. नांदापूरकर सभागृह, सन्मित्र कॉलनी, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होईल. असे संयोजन समितीचे सदस्य प्राचार्य रेखा शेळके, डॉ. निळकंठ डाके, डॉ. गणेश मोहिते, डॉ. प्रेरणा दळवी, डॉ. समिता जाधव, डॉ. पुंडलिक कोलते, डॉ. रमेश औताडे, डॉ. जिजा शिंदे, श्रीमती आशा देशपांडे, श्री.संजीव बोराडे यांनी कळवले आहे.

## यूजीसी समता नियमावलीच्या समर्थनार्थ जिल्हा प्रशासनाला निवेदन; उच्च शिक्षणात समावेशकतेसाठी जोरदार मागणी




**जालना दि.11 :** विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) प्रस्तावित समता नियमावलीच्या समर्थनार्थ आज विविध सामाजिक संघटना, विद्यार्थी संघटना, शिक्षक प्रतिनिधी आणि प्रगतिशील कार्यकर्त्यांनी जिल्हाप्रशासनाकडे निवेदन सादर करत उच्च शिक्षणात सामाजिक न्याय आणि समावेशकतेसाठी ठोस पावले उचलण्याची मागणी केली. शैक्षणिक संस्थांमध्ये वाढत्या भेदभावाच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि वंचित घटकांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही नियमावली अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, अनेक विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये जातीय, लिंगभेद आणि सामाजिक पार्श्वभूमीच्या आधारे सूक्ष्म व उघड भेदभावाच्या घटना समोर येत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या पार्श्वभूमीवर यूजीसीची समता नियमावली ही विद्यार्थ्यांना समान संधी आणि न्याय देण्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरेल तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारी प्रभावी यंत्रणा ठरू शकते. निवेदनात सर्व उच्च शिक्षण संस्थांमध्ये "समता कक्ष" (Equity Cell) स्थापन करून भेदभावाविरोधी तक्रार निवारण प्रणाली मजबूत करण्याची मागणी करण्यात आली. तसेच शिक्षक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी संवेदनशीलता प्रशिक्षण आयोजित करणे आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख साधन असून ते काही विशिष्ट सामाजिक गटांपुरते मर्यादित राहू नये. यूजीसी समता नियमावलीमुळे शिक्षण क्षेत्र अधिक लोकशाहीवादी आणि समावेशक होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

जिल्हा प्रशासनाने प्रतिनिधी मंडळाचे निवेदन स्वीकारून ते संबंधित विभागाकडे पाठवण्याचे आश्वासन दिले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी शांततामय पद्धतीने आपली भूमिका मांडत नियमावलीच्या लवकर अंमलबजावणीची मागणी केली. यावेळी प्रा. डॉ. कालिदास सूर्यवंशी आणि प्रा. राजक्रांती वळसे यांनी भूमिका विषद केली.

याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते श्री. कल्याण दळे, प्रा. डॉ.शांताराम रायपुरे,ॲड. शिवाजीराव आदमाने, कॉ. अण्णा सावंत, प्रा. डॉ. विजयकुमार कुमठेकर,ॲड. मा. नी. बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते हरीश रत्नपारखे, अफसर मिर्झा, गणेशराव आढे, माधव हिवाळे, संजय आदमाने, मदन जाधव, श्री. आसाराम, श्री. अशोक मस्के, पंजाबराव खिल्लारे, केशव पगारे, एस. एम. भालेराव, अविनाश बोरुडे, राहुल जाधव, बुद्धभूषण साळवे, ढगे प्रकाश गडवे, प्रा.डॉ. प्रियदर्शन भवरे, प्रा. डॉ. जानराव डी. एम., प्रा. डॉ. बसवराज कोरे, प्रा. सत्यपाल गायकवाड, प्रा. संभाजी कांबळे, प्रा. डॉ. प्रवीण कोकणे, प्रा. शशिकांत चौधरी, प्रा. डॉ. वेंकटेश कोरेबोईनवाड, प्रा.डॉ. साहेबराव पोपळघट, प्रा.डॉ. के. जी. सोनकांबळे, प्रा. डॉ. शहाजी सहदेवन, प्रा. डॉ. सचिन जयस्वाल, प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण याची यावेळी उपस्थिती होती.

## तो हरवलाय

तो हरवलाय
सोशल मीडियाच्या भ्रमजाळात
वास्तवापासून कोसो दूर गेल्याने..

तो आता
कुणाशी बोलत नाही
मोबाईलच्या स्क्रीनमधून
जीव त्याचा निघत नाही ..

आता तो
नेटवर्कच्या लहरींवर तरंगत असतो
मेसेजच्या कोरड्या ढगासोबत..

आता तो लढवत आहे पावनखिंड
स्टेटसच्या रणांगणामध्ये
ऑनलाईन गेमची रोज..

घरात राहून ही आताशा
तो बोलत नाही
घरातील माणसाशी
इन्स्टाग्रामवर आल्यापासून..

आता
फेसबुकवर उघडलं त्यानं खातं
अन् टाकत बसतो रिल
यू ट्यूब अन् इन्स्टावर
रिल्स स्टार होण्यासाठी..

शेती मातीत राबणाऱ्या
घरच्या रिअल स्टारना डावलून
लाईक-शेअरच्या भुकेपायी..
आता रिचार्ज संपला की
कसंतरी होतं त्याला
बेवड्याप्रमाणे..
अन् आतुरतो तो
आभासी टाळ्यांसाठी
अन् मारतो पॅक अनलिमिट रिचार्जचा
नेट संपू नये म्हणून..

आता तो बोलत नाही
हसू आणि आसू ही दावत नाही
सगळं इमोजी करून घेतात..

हाय- फाय जगणं त्याचं
वाय- फाय वर चालत आहे
मोबाईलच्या व्यसनापायी
तो जगणं विसरून जात आहे..

**ज्ञानेश्वर गायके ,कन्नड**

## पर्यावरण रक्षण

अबब निसर्गाचे
बिघडले संतुलन
घरं किती वाढली
सपाट झाले वन

कारखान्या पासून
निघतो विषारी धूर
पाखरांचा थवा
गेला शहरापासून दूर

वाहनांची गर्दी
अन् अपुरे रोड
ध्वनी प्रदूषणाने
मोडली सर्वांची खोड

पाऊस पडतो अपुरा
जंगलतोडीमुळे
स्वार्थी माणसाचे
कधी उघडणार डोळे?

दुषित पाण्यामुळे
पसरते रोगाची साथ
जीवघेण्या संकटावर
कशी करणार मात ?

प्रत्येकाने लावावे
एक तरी झाड
पर्यावरण रक्षणासाठी
करावी त्यांची वाढ



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ फेब्रुवारी २०२६

## चांगली पुस्तके आणि सज्जन माणसे लवकर भेटत नाही - अय्युब पठाण लोहगावकर



**छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी)** चापानेर येथील श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल मध्ये नुकतेच कवी आपल्या भेटीला हा कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी कवी अय्युब पठाण लोहगावकर म्हणाले " या धावपळीच्या जीवनात विद्यार्थ्याना " चांगली पुस्तके व सज्जन माणसे यांची लवकर भेट होत नाही." कवी पठाण यांनी " पाणपोई " कवितेविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. शालेय शिक्षणात पाठ्यपुस्तकातील कविता वाचणे हा नेहमीचा भाग असतो; मात्र त्या कवितेचा कवी स्वतः विद्यार्थ्यांशी संवाद साधतो, कविता समजावून सांगतो आणि तिच्यामागील भावार्थ उलगडतो, असा अनुभव क्वचितच मिळतो. असा आगळावेगळा व प्रेरणादायी अनुभव श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल, चापानेर येथील इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना मिळाला. मराठी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या 'पाणपोई' या कवितेचे कवी, प्रसिद्ध साहित्यिक, सेवानिवृत्त शिक्षक तसेच विविध पुस्तकांचे लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी विद्यार्थ्यांशी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून थेट संवाद साधला. ठरलेल्या वेळेनुसार आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात श्री.पठाण सरांनी 'पाणपोई' कवितेचे भावपूर्ण वाचन करून तिची पार्श्वभूमी, सामाजिक आशय आणि मानवी मूल्ये अतिशय सोप्या व ओघवत्या शब्दांत विद्यार्थ्यांसमोर मांडली पाठ्य पुस्तकातील कवितेचा कवी प्रत्यक्ष दिसताच विद्यार्थी क्षणभर आश्चर्यचकित झाले. पहिल्यांदाच पाठ्यपुस्तकातील कवी स्वतः कविता शिकवत असल्याचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी अतिशय भावनिक आणि प्रेरणादायी ठरला. अय्युब पठाण सरांनी कवितेतील प्रत्येक कडव्याचा अर्थ स्पष्ट करत पाणपोईसारख्या उपक्रमामागील माणुसकी, परोपकार आणि सामाजिक बांधिलकीचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर ठसवले. या संवाद सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना श्री. पठाण सरांनी समर्पक उत्तरे देत कविता लेखनामागील प्रेरणा, अनुभव आणि साहित्यनिर्मितीचा प्रवास उलगडून सांगितला. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ कविता समजली नाही, तर साहित्यिकाचा विचारविश्व आणि संवेदनशील दृष्टीकोनही अनुभवता आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्याविषयी अधिक आपुलकी निर्माण झाली असून वाचन, लेखन आणि सर्जनशीलतेकडे वळण्याची प्रेरणा मिळाली आहे. शाळेच्या शिक्षकवर्गाने व व्यवस्थापनाने या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे अध्यापन अधिक प्रभावी व जिवंत होत असल्याचे मत व्यक्त केले. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शिक्षण अधिक अनुभवसमृद्ध करण्याचा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या स्मरणात कायम राहणारा ठरला आहे. यावेळी संस्थेच्या वतीने अध्यक्ष दशरथ सोमसे सर, प्राचार्य कौशल्य सोमासे, उपप्राचार्य संदीप वाकडे,( मराठी विभाग ) प्रमुख वर्षा जाधव यांनी कवी अय्युब पठाण लोहगावकरांचे आभार मानले.

# कन्नड येथे तिफण कविता महोत्सवात काव्यचित्र प्रदर्शनाचे उदघाटन



**कन्नड (प्रतिनिधी) :** कन्नड नगरीत शब्द आणि रंगांचा एक अद्भुत संगम अनुभवायला मिळाला. राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाच्या निमित्ताने सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात उभारलेल्या काव्यचित्र प्रदर्शनाने साहित्यप्रेमींच्या मनात वेगळेच कुतूहल आणि आनंद निर्माण केला.त्रैमासिक तिफण, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवात काव्य आणि दृश्यकलेचा सुंदर सेतू उभा राहिला. कन्नड तालुक्यातील ज्येष्ठ कलाशिक्षक श्री. गिरीष सरनाईक, श्री. मनोज चौधरी, श्री. विजय बोर्से आणि श्री. बी. एस. सोननीस यांच्या अथक परिश्रमातून साकारलेले हे काव्यचित्र प्रदर्शन कवी नारायण सुमंत यांच्या शुभहस्ते उद्घाटित झाले.उद्घाटन सोहळ्याला मालेगावचे प्रसिद्ध कवी राजेंद्र दिघे, प्राचार्य डॉ. विजय भोसले, सुप्रसिद्ध कवयित्री प्रतिभा खैरनार, ज्येष्ठ विधीज्ञ कृष्णा पाटील जाधव, तिफणकार डॉ. शिवाजी हुसे, साने गुरुजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. मिलिंद पाटील तसेच कन्नड तालुक्याचे नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला साहित्यिक उंची लाभली.प्रदर्शनात राज्यातील विविध कवींच्या कवितांवर आधारित काव्यचित्रांची आकर्षक मांडणी करण्यात आली होती. प्रसिद्ध कवयित्री प्रतिभा अहिरे, डॉ. रामचंद्र झाडे, रानकवी अरुण थोरात, पेरणीकार ज्ञानेश्वर गायके, संदीप ढाकणे, प्रवीण दाभाडे, भिमराव सोनवणे, शिवनाथ गायकवाड, लक्ष्मण वाल्डे, अमोल मोकासे, अनिता राठोड, शुभदा देवरे, श्रीराम दापके, सुरेश औटे, गीतांजली गजबे, केशरचंद राठोड, समाधान निकम, जगन्नाथ जाधव, ब्रम्हगिरी गोस्वामी, प्रकाश शहरवाले, रामेश्वर मोरे तसेच ज्येष्ठ कवी दत्ता मोरस्कर आदी कवींच्या काव्यविश्वाला रंगरेषांतून नवे आयाम प्राप्त झाले. शब्दांच्या आशयाला रंगरेषांच्या माध्यमातून साकार देणारी ही काव्यचित्रे रसिकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती. प्रत्येक चित्रातून सामाजिक वास्तव, सांस्कृतिक संवेदना आणि मानवी भावविश्वाचे विविध पैलू जिवंत होताना दिसत होते. कविता केवळ वाचण्यापुरती न राहता ती पाहण्याचा आणि अनुभवण्याचा नवा दृष्टिकोन या प्रदर्शनातून उलगडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संयोजक प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांनी प्रदर्शनामागील संकल्पना स्पष्ट करताना सांगितले की, कवितेचा आशय अधिक व्यापक पद्धतीने रसिकांपर्यंत पोहोचावा आणि नव्या पिढीला साहित्य व कलेचा संगम अनुभवता यावा, या हेतूने या काव्यचित्र प्रदर्शनाची संकल्पना साकारण्यात आली. काव्य आणि चित्र यांचा संवाद हा साहित्यिक अभिव्यक्तीचा एक नवा आणि प्रभावी आयाम ठरू शकतो, असेही त्यांनी नमूद केले.या महोत्सवामुळे कन्नड शहरात साहित्यिक आणि कलात्मक वातावरण निर्माण झाले असून काव्यचित्र प्रदर्शनाने कविता रसिकांना एक वेगळाच अनुभव दिला. कवी, चित्रकार, विद्यार्थी आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कलासोहळ्याचा आस्वाद घेत होते. असा साहित्य–कला संगम वेळोवेळी कन्नड तालुक्यात घडत राहावा, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.कन्नड नगरीत रंगलेला हा शब्द आणि रंगांचा सोहळा साहित्य संस्कृतीच्या नव्या शक्यता उजळवून गेला.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ फेब्रुवारी २०२६

## राजकीय क्षेत्रात धर्माचा हस्तक्षेप वाढला की लोकशाहीचे अवमूल्यन होते - डॉ. महादेव गव्हाणे




**मुरुम/धाराशिव (प्रा. सुधीर पंचगल्ले)** येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने जेष्ठ राजकीय अभ्यासक डॉ. मोईन शाकीर व्याख्यानमालेचे सोमवारी (ता.९ ) रोजी सकाळी १० वाजता तीन सत्रामध्ये महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख होते. यावेळी विद्यापीठ उपकेंद्राचे संचालक प्रा. डॉ रमेश चौगुले यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न झाले. प्रारंभी शिक्षण महर्षी दि. बापूजी साळुंखे व मातोश्री यांच्या प्रतिमेस सर्व मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पहिल्या सत्रात प्रमुख मार्गदर्शक लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे म्हणाले की, डॉ. मोईन शाकीर यांनी आयुष्यभर लोकशाहीचे मूल्य जपण्याचे कार्य केले. त्यांनी धर्मनिरपेक्षतेची शिकवण आपल्या विचारांतुन समाजास दिली, त्यांच्या मते, धर्म व विज्ञान यांचा समन्वय साधण्याची आज खूप आवश्यकता आहे, कारण या समन्वयामुळेच लोकशाही अबाधित राहील, माणूस एकच आहे, सर्वांच्या शरीराची ठेवण ही एकच आहे. ही नैसर्गिक देणगी आहे, आपल्या धार्मिक प्रार्थना जरी वेगवेगळ्या असल्या तरी कुठेतरी त्यातही साम्य आहे, धर्माचे पालन हे वैयक्तिक असावे, राजकीय क्षेत्रात नको, कारण असे जर झाले तर लोकशाहीचे मूल्य हे पायदळी तुडवली जातील, धर्माच्या, भाषेच्याही पलीकडे माणूस आहे, आज माणसाला माणसांचीच जास्त भीती वाटत आहे. मतदानाचा अधिकार म्हणजे लोकशाही नाही, देशातले आंदोलने संपले की लोकशाही संपली, असे त्यांनी विचार व्यक्त केले. द्वितीय सत्रात मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील राज्यशास्त्र संशोधन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. महेशकुमार मोटे म्हणाले की, आपण माणूस म्हणून जन्माला आलो आहोत, ही बाब महत्त्वाची तर आहेच, पण माणूस मोठा त्याच्या पदामुळे नाही, तर त्याच्या कार्यकर्तृत्वामुळे मोठा होतो, असे व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. मोईन शाकीर होत. डॉ. शाकीर हे लोकशाहीचे खंदे समर्थक होते. त्यांच्या मते, लोकशाही ही केवळ राजकीय प्रक्रिया न राहता. ती प्रत्यक्षात जनतेत राबवली पाहिजे. त्यांच्या लोकशाहीविषयक विचारांचा केंद्रबिंदू समाजवाद, समतावाद आणि धर्मनिरपेक्ष लोकशाही हा होता. जनताच खरी लोकशाही चालवत असते, लोकशाहीला जीवनशैली माणून लोकशाहीचा अंगिकार करणे गरजेचे आहे. व्यक्तिला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली की, तो लोकशाहीशी सुसंगत होतो. जन आंदोलने ही लोकशाही जीवंत असल्याचे द्योतक आहेत. लोकशाही टिकवण्यासाठी नागरिक हे जागरूक, विवेकी आणि सक्रिय असणे आवश्यक असल्याचे शेवटी ते म्हणाले. या सत्राचा अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख म्हणाले की, लोकशाहीत बहुमताचे राज्य असते, पण अल्पसंख्यांकांचे अधिकार सुरक्षित असले पाहिजेत. संविधान आमचा धर्म आहे. विविधता हीच भारताची शक्ती असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.तृतीय सत्रात वाशी येथील मामासाहेब जगदाळे महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ आनंद करडे हे म्हणाले की, हमीद दलवाई, डॉ. असगर अली, डॉ. मौलाना आझाद यांचे कार्य भारतीयांना विसरता येणार नाही, डॉ. मोईन शाकीर हे एक प्राध्यापक या नात्याने विद्यार्थ्यांशी जोडले गेले होते. हा आदर्श आपण घेणे गरजेचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. तृतीय सत्राचे अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. प्रकाश कांबळे यांनी केला. सदर व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. दत्तात्रय साखरे, डॉ. बालाजी गुंड, डॉ. मंगेश भोसले यांच्यासह सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका यांनी पुढाकार घेतला. सदर प्रसंगी तिन्ही सत्रांचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अरविंद हंगरगेकर यांनी तर आभार प्रा. डॉ. बालाजी गुंड यांनी मानले. यावेळी सर्व शाखेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जागे राहा

खोट्यांच्या गर्द साम्राज्यात सतत जागे राहा,
सत्याच्या जळत्या हुंकारात निर्भयतेने जागे राहा।

मुखवट्यांच्या रंगल्या दरबारात सावध जागे राहा,
आरशाच्या कडव्या सत्यप्रहारात दृढ जागे राहा।

सत्तेच्या मधुर पण विषारी व्यवहारात सतर्कतेने जागे राहा,
विवेकाच्या धगधगत्या अंगारात ज्वलंत जागे राहा।

विश्वास विकणाऱ्या या बाजारात काळजीने जागे राहा,
शब्दांच्या लपलेल्या प्रत्येक वारात सजग जागे राहा।

जेव्हा मौनालाच जखडतात साखळदंडात प्रश्नांनी जागे राहा,
प्रश्नांच्या ज्वालामुखी प्रहारात दबाव न घेता जागे राहा।

इतिहास वाकतो नेहमी जाग्या निर्धारात साक्षीदार राहा,
मूल्यांच्या त्या भक्कम आधारात अढळ जागे राहा।

अंधार कितीही दाटला तरी धैर्याने जागे राहा,
प्रकाशाच्या त्या निर्णायक प्रहारात अविचल राहून जागे राहा।

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## मुरूम येथे श्री दासबोध व श्री माऊली चरित्रामृत पारायण सोहळ्याची सांगता



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जन्मात सुख समाधान हवे असेल तर माऊलींचे नामस्मरण करत भक्ती करा - श्री स स बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) ज्यात आपण सुख शोधतो तो तात्पुरता मिळालेला देह नाशवंत आहे.भगवंत अविनाशी असून परब्रह्म हे शाश्वत आहे.मायेला अंत असून ब्रह्मा अनंत आहे.सुख भगवंता जवळ आहे.पण भगवंत नेमके कुठे आहेत हेच आपल्याला समजत नाही.माऊलींच्या भजनात परमानंद आहे.तुकाराम महाराजांनी माऊलींकडे "हेचि दान देगा देवा,, तुझा विसर न व्हावा" हेच दान मागितले आहे.त्यामुळे माऊलींची भक्ती करत नामस्मरण केल्यास जन्मात शाश्वत सुख आणि समाधान लाभते असे श्री स स बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) यांनी सांगितले. मुरूम येथील सोनार गल्ली येथे श्री स स बाळकृष्ण माऊली नंदेश्वर यांच्या १२५ व्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती निमित्त श्री दासबोध व श्री माऊली चरित्रामृत पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी "हेचि दान देगा देवा,, तुझा विसर न व्हावा" या अभंगावर निरूपण करताना ते बोलत होते.दि ४ फेब्रुवारी ते दि १० फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या पारायण सोहळ्यात दररोज पहाटे ५ ते ६ काकड आरती,सकाळी ७ ते ८ श्रींची पूजा व अभिषेक,८ ते ११ दासबोध व ग्रंथपारायन, ११ ते दुपारी १२.३० पर्यंत प्रवचन व भजन,रात्री ८ ते ९ अभंग भजन,९ ते ११ कीर्तन असा दिनक्रम होता.संपूर्ण सप्ताहादरम्यान श्री कन्हय्या वारकरी शिक्षण संस्था परळी वैजिनाथ यांनी भजन सेवा दिली.तर दररोज रात्री युवा सेवा मंडळ सोनार गल्ली यांच्याकडून भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आले.पारायण सोहळ्यात हभप ऋषिकेश महाराज जरे (आळंदी),हभप ज्ञानेश्वर महाराज उंगळकर (परभणी),हभप सागर महाराज बोराटे (सातारा),बालकीर्तनकार हभप चेतन महाराज फंदे (लातूर),हभप गोविंद महाराज (सेलू),हभप ॲड पांडुरंग महाराज लोमटे (धाराशिव) यांनी कीर्तनातून समाज प्रबोधन केले.बुधवार (दि ११) रोजी दुपारी श्री स स बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) यांच्या उपस्थितीत माऊलींवर पुष्पवृष्टी करून पारायण सोहळ्याची सांगता करण्यात आली.यावेळी उमरगा जनता बँकेचे अध्यक्ष शरण पाटील,सोलापूर महापालिकेचे उपायुक्त गिरीष पंडित,उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण,जिल्हा परिषद सदस्य रफिक तांबोळी,सागर पाटील,प्रा उमाकांत महामुनी,नगरसेविका ज्योती शेळके आदींसह मुरूम व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमानंतर आयोजकांकडून महाप्रसाद वाटप करण्यात आले.

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती


website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ फेब्रुवारी २०२६


## आदर्श महाविद्यालयाचेराष्ट्रीय सेवा योजना शिबिर कुन्हाळी येथे सुरू



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , श्री छत्रपती संभाजीनगर व आदर्श महाविद्यालय उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिरास आज बुधवार दि. 11 फेब्रुवारी पासून तालुक्यातील कुन्हाळी येथे मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे." पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन व पडीक जमिनीच्या शाश्वत विकासात युवक- युवतींची भूमिका " या संकल्पनेवर आधारित सात दिवस चालणाऱ्या या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक मल्लीनाथ दंडगे यांच्या हस्ते करण्यात आले . अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव रामकृष्णपंत खरोसेकर होते. सरपंच कमलादेवी लव्हरे, उपसरपंच सुधीर पाटील , प्राचार्य डॉ. राम सोलंकर, मुख्याध्यापक बलभीम चव्हाण, पोलीस पाटील संजय पाटील, यांची प्रमुख उपस्थिती होती. सेंद्रीय शेती , विकसित भारत , पर्यावरण संवर्धन , ग्रामस्वच्छता, शाळा परिसर स्वच्छता , आपला देश आपले संविधान , या विविध विषयावर तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना रामकृष्णपंत खरोसेकर म्हणाले कि - विद्यार्थी हा समाज व्यवस्थेचा पाया आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून उत्कृष्ट समाज निर्मिती करणारे विद्यार्थी घडविण्याचे पवित्र कार्य केले जाते. तरुण वयात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिबिरा मुळे समाजसेवा करण्याची व शिकण्याची संधी मिळते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सुसंस्कारीत विद्यार्थी घडावेत अशी अपेक्षा खरोसेकर यांनी या वेळी केली.या वेळी प्राचार्य डॉ. राम सोलंकर यांचे मार्गदर्शन झाले . प्राचार्य डॉ. सोलंकर म्हणाले कि - महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञाना बरोबरच समाज सेवेचे कौशल्य आत्मसात करण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे. समाजसेवे मुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मोठी मदत होते. आजचे विद्यार्थी हे उद्याच्या विकसित भारत देशाचे निर्माते आहेत.विद्यार्थ्यांनी प्रगतशील देशाच्या निर्मितीत आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा . राष्ट्रीय सेवा योजना हे सामाजिक अध्यात्म आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विकसित राष्ट्र निर्मिती करिता आपले योगदान द्यावे असे अवाहन प्राचार्य डॉ. सोलंकर यांनी या वेळी केले.प्रास्ताविक व सुत्रसंचालन प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार यांनी केले. आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. तात्याराव चव्हाण यांनी मानले. प्राध्यापक, शिबिरार्थी विद्यार्थी , कुन्हाळी ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.



## अति तिथे माती होते : मंत्री शंभूराज देसाईंचा जयकुमार गोरेंवर अप्रत्यक्ष निशाणा

**सातारा :** जिल्हा परिषद निवडणुकीत भाजप स्वबळावर लढली, तर त्यांच्या विरोधात एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आल्याने राजकीय समीकरणे बदलली आहेत. या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसले तरी, निकालानंतर भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शिवसेना आणि राष्ट्रवादीने आता सत्तास्थापनेच्या हालचाली गतिमान केल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर, पाटण येथील विजयी सभेत बोलताना मंत्री शंभूराज देसाई यांनी सूचक वक्तव्य करत मंत्री जयकुमार गोरे यांना खोचक टोला लगावला, तसेच गणेश नाईक यांच्यावरही सडकून टीका केली आहे.

शंभूराज देसाई म्हणाले, निवडणुकीत पाटणमध्ये मोठे नेते आले, भाषणं झाली पण जिल्हा परिषदेचा निकाल बघा. एकीकडे राष्ट्रवादीचे दोन्ही गट आणि शिवसेना तर दुसरीकडे भाजप. मात्र, बेरीज काय झाली, अति तिथे माती होते. अति जाऊन कुठे केले तर माणसे योग्य वेळेची योग्य संधीची वाट बघत असतात, असे म्हणत देसाई यांनी नाव न घेत पालकमंत्री जयकुमार गोरे आणि मंत्री गणेश नाईक यांच्यावर टीका केली. गणेश नाईक यांनी शंभुराज देसाई यांना पालकमंत्री ऐवजी मालकमंत्री म्हणत टीका केली होती.

सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने सत्तेसाठी त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली असून, राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. भाजप हा सर्वाधिक जागा मिळवणारा मोठा पक्ष ठरला असला, तरी त्यांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, काँग्रेस, स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि अपक्षांनी एकत्र येत तगडे आव्हान उभे केले आहे. या पार्श्वभूमीवर, एका पंचतारांकित हॉटेलमध्ये राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या नेत्यांची महत्त्वाची बैठक पार पडली असून, मंत्री मकरंद पाटील व मंत्री शंभूराज देसाई यांनी सत्ता स्थापनेबाबत प्राथमिक चर्चा झाल्याचे स्पष्ट केल्याने जिल्ह्यातील राजकीय समीकरणे आता वेगाने बदलताना दिसत आहेत.

सातारा जिल्हा परिषदेच्या ६५ जागांच्या निवडणुकीत २७ जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी बहुमतासाठी आवश्यक असलेला ३३ हा जादूई आकडा गाठण्यात त्यांना अपयश आले आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (२० जागा) आणि शिवसेना (१५ जागा) यांचे संख्याबळ एकत्रित ३५ होत असल्याने सत्तेचे पारडे त्यांच्या बाजूने झुकले असून, सत्ता स्थापनेसाठी या दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. काँग्रेस, स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि अपक्षांची साथही या आघाडीला मिळण्याची चिन्हे आहेत. परिणामी, सर्वाधिक जागा मिळवूनही भाजपने सत्तेची संधी गमावल्याची चर्चा आता जिल्हाभरात रंगू लागली आहे.